**Time : 3 Hours** **MARATHI LANGUAGE II (CWSN)**

**Subject Code**

| H | 4 | 3 | 2 |
|---|---|---|---|

**Total No. of Questions : 8** **(Printed Pages : 8)** **Maximum Marks : 80**

***सूचना :*** (*i*) शुद्धलेखनाचे नवीन नियम पाळावेत.

(*ii*) उजवीकडील अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.

1. (अ) खाली पाठ्यपुस्तकातील पाठांतील काही उद्‌गार दिले आहेत व त्यापुढे पर्याय दिले आहेत योग्य ते पर्याय निवडून लिहा :

(*i*) ''अन्न आलंच नाही. मग जाणार कुठं ?'' 2

लेखक : वि. वा. शिरवाडकर/रमेश मंत्री/वि.स. खांडेकर

पाठ : मांजर व्हा/मोत्याचे पीक/नेत्रदान

(*ii*) ''तर त्यावेळी शंभर रुपये द्यावे लागतील'' 2

लेखक : पु. ल. देशपांडे/दिवाकर/रमेश मंत्री

पाठ : रावसाहेब/मांजर व्हा/ माझी प्रकाशवाट

(*iii*) ''श्याम! तुझ्या आईने तुला खर्वस पाठविला आहे. तुझ्यासाठी मी घेऊन आलो आहे. 2

लेखक : वि.स. खांडेकर/साने गुरुजी/जयवंत दळवी

पाठ : उदार पितृहृदय/वेडे झाड/रावसाहेब

(ब) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात लिहा : 3

(*i*) डॉ. रघुनाथ माशेलकर यांचा जन्म कुठे झाला ?

(*ii*) दिवाकरपंताच्या मृत्यूमुळे त्यांची जागा कुणाला मिळाली ?

(*iii*) रावसाहेबांनी आपली खोली किती जणांना विकली होती ?

(क) खालील उद्‌गार कुणी कुणाला उद्‌देशून म्हटले ते लिहा : 3

(*i*) ''काय झालं बाई वासराला''

(*ii*) ''मांजर काय नि माकड काय, दोन्हीचे दर एकच आहेत''.

(*iii*) सूनबाई चाललय काय ? सरबत करताय ना ?

(ड) खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **दोन** ते **तीन** वाक्यात लिहा : 4

(*i*) काझिरंगा अभयारण्यात लेखकाने किती गेंडे पाहिले ?

(*ii*) लेखक गांधीजींचे चित्र कसे रेखाटायचे ?

(*iii*) नकुलामार्फत कर्णाने कुंतीला कोणता निरोप पाठविला ?

2. (अ) खाली पाठ्यपुस्तकातील कवितांतील काही ओळी दिल्या आहेत व त्यापुढे पर्याय दिले आहेत योग्य ते पर्याय निवडून लिहा :

(*i*) सद्‌गुरुराया माझा आनंदसागर त्रैलोक्या आधार गुरुराव 2

कवी : संत नामदेव/संत एकनाथ/संत रामदास

कविता : संतकृपा जाली/गुरुमहिमा/हरिभजनावीण काळ

(*ii*) काट्यासारखं सलायचं की फुला सारखं फुलायचं ? तुम्हीच ठरवा 2

कवी : मंगेश पाडगावकर/कुसुमाग्रज/नरेंद्र बोडके

कविता : देखणे ते चेहरे/सांगा कसं जगायचं/माये ग माये

(*iii*) बेबीताई देनार हायेत तेंची बुकं व्ह्यांनाच पडतीन बग थोडंस पैकं 2

कवी : बा.भ. बोरकर/ग. दि. माडगूळकर/संजीवनी बोकिल

कविता : माये ग माये/सांगा कसं जगायचं/देखणे ते चेहरे

(ब) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात लिहा : 3

(*i*) जीवनावेगळे कोण तळमळत आहे ?

(*ii*) सागराने भारतमातेला कोणते वचन दिले ?

(*iii*) उभे पिंक कुणाबरोबर डोलते ?

(क) खालील दिलेल्या काव्यांशाच्या योग्य जोड्या लावा : 4

| | 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|---|
| (*i*) | नामा तयाचा किंकर | झोपडी आईची प्यारी |
| (*ii*) | प्रासाद इथें रम्य परिमज भारी | या मोल नाही फारसे |
| (*iii*) | गोरटे की सावळे | ह्या नव्या कट्यारी |
| (*iv*) | तेच घाव करिती फिरुनी | आणि माझ्या पापणीला पूर यावे |
| | | तेणे रचिले आवार |
| | | तवापून येकच सपान पडतंय मला |

(ड) खालील कवितेच्या ओळी कंसातील योग्य शब्द वापरून पूर्ण करा : 3

(*i*) ज्ञानदेवे घातला ........................ उभारिले देवालया.

(ठाया, पाया, काया)

(*ii*) याच मंत्राने ................................ राष्ट्र सारे जागले.

(जनाचें, लोकांचे, मृतांचे)

(*iii*) काळोखात ............................. की प्रकाशात उडायचं.

(पडायचं, कुढायचं, लपायचं)

3. (अ) खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांच्या जाती लिहा : 4

(*i*) मी लहानपणी वडिलां<u>कडून</u> पुष्कळ मार <u>खाल्ला</u>.

(*ii*) झाडाच्या खोडाएवढे पाय असलेले पक्षी <u>आणि</u> हत्तीसुद्धा गिळणारे <u>साप</u>.

(आ) खालील शब्दांची भाववाचक नामे लिहा : 3

(*i*) दीन

(*ii*) विविध

(*iii*) कुशल

(इ) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा : 3

(*i*) पवित्र

(*ii*) स्वच्छ

(*iii*) सुंदर

(ई) खालील शब्दांची विशेषणे लिहा : 3

(*i*) मेहनत

(*ii*) चमत्कार

(*iii*) गर्व

(उ) खालील शब्दांचे वचन बदला : 3

(*i*) वैज्ञानिक

(*ii*) खिडकी

(*iii*) घर

(ऊ) खालील शब्दांचे लिंग बदला : 3

(*i*) मांजर

(*ii*) अध्यापक

(*iii*) वाघ

4. 'प' गटातील वाक्‌प्रचार आणि 'फ' गटातील वाक्‌प्रचारांचे अर्थ यांच्या योग्य जोड्या जुळवून लिहा : 5

| | **'प'** | **'फ'** |
|---|---|---|
| (*i*) | प्रतारणा करणे | वाद घालणे |
| (*ii*) | हुज्जत घालणे | प्रभाव टाकणे |
| (*iii*) | पोटात शिरणे | काळजी नसणे |
| (*iv*) | छाप पाडणे | मोठ्याने हसणे |
| (*v*) | पोट धरून हसणे | आरडा-ओरडा होणे |
| | | फसवणे |
| | | वश करून घेणे |

5. (अ) खालील उतारा वाचून त्या खाली दिलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे लिहा : 5

हावभाव व आवाजाचा पोत व त्यातील चढउतारांवरून आपण समोरच्याच्या मनोभूमिका वाचत असतो. कारण बोलण्याच्या भाषेचा शोध मानवाच्या दूरवरच्या इतिहासात, तुलनेनं अगदी अलीकडचा आहे. प्रचंड वैश्विक हिशेबानं पाहिलं, तर अगदी आज सकाळीच बोलीभाषेचा शोध लागलेला आहे. आदिम युगांपासून माणूस कण्हणं, कुथणं, ओरडणं आणि गुरगुरणं एवढंच करत आलेला आहे. त्या पेक्षा जास्त करण्याची त्याला गरज पडली नाही. याचा अर्थ

लाखो-करोडो वर्षे एक मानव दुसऱ्या मानवाशी संवाद साधण्यासाठी आपलं शरीर, चेहऱ्यावरील हावभाव आणि विविध प्रकारच्या आवाजांचा उपयोग करत असे. शब्दांचा नाही. आणि आजही इतर लोक वा वस्तूंबद्दलच्या आपल्या मनोभूमिका व भावना व्यक्त करण्यासाठी आपण तेच करतो. आपल्या जवळ प्रत्यक्ष स्पर्शाव्यतिरिक्त, तान्ह्या बाळाशी संवाद साधण्याचा एकमेव मार्ग शारीरिक हालचाली, चेहऱ्यावरचे हावभाव आणि आवाज हाय तर आहे. आणि त्यातली कृत्रिमता ओळखण्याची विलक्षण क्षमता त्या इवल्याशा जीवातही असते.

(—द मॅजिक ऑफ थिंकींग बिग)

**प्रश्न :**

(*i*) समोरच्याची मनोभूमिका आपण कशी वाचत असतो ? 1

(*ii*) आदिम युगांपासून माणूस काय करत आलेला आहे ? 1

(*iii*) लाखो-करोडो वर्षापूर्वी एक मानव दुसऱ्या मानवाशी कसा संवाद साधत ? 1

(*iv*) तान्ह्या बाळाशी आपण कसा संवाद साधतो ? 1

(*v*) उताऱ्यास योग्य शीर्षक द्या. 1

(ब) खालील उतारा वाचून त्या खाली दिलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे लिहा : 5

जीवन म्हणजे एक रंगमंच आहे आणि आपण त्या रंगपटावर भूमिका निभावणारी पात्रं पण इथे प्रत्येकालाच नुसती एकच भूमिका करून चालत नाही, तर वेगवेगळ्या प्रसंगी वेगवेगळ्या नात्याचे वेगवेगळे पैलू निभवावे लागतात. पण आश्चर्य हे की या नाटकाचं संवादस्वातंत्र्य मात्र प्रत्येकालाच असतं. आयुष्य सर्वार्थाने जगताना आपण आपलं जीवन सुखद, सुंदर, आनंदी, आरामदायक असावं, वेळप्रसंगी आपल्या सोबत कुणीतरी हवं. सर्वात महत्त्वाचं म्हणजे प्रेम, प्रेरणा, जिव्हाळा, आपूलकी, आधार मिळावा म्हणून नातेसंबंध जपत असतो.

नात्यांशिवाय मनुष्य म्हणजे पानगळती झालेलं जीर्ण झाड ज्यावर पक्षीदेखील आपलं घरटं बांधत नाहीत. ही पानगळती होण्यास स्वार्थी वृत्ती, अहंमपणा, व्देष, मत्सर, विसंवाद, हलके

कान या गोष्टी जबाबदार असतात. याचा विचार करता नातेसंबंध दृढ होण्याच्या दृष्टीने आपल्या संस्कृतीनुसारही आपण मकरसंक्रांतीला एकमेकांना तिलगूळ देऊन तिलगूळ घ्या गोड गोड बोला, असं बोलत दुरावे कमी करत असतो. पण त्याचा गोडवा मात्र कायम ठेवायला विसरतो. हाच गोडवा टिकवून स्नेहसंबंध दृढ प्रस्थापित करण्याची तत्त्वं आहेत. या तत्त्वांच्या आधारावर आपल्याला या नातेसंबंधाचे बंध अधिक दृढ करता येतील.

(—रिचार्ज –: संजय गोविलकर)

**प्रश्न :**

(*i*) जीवन म्हणजे काय ? 1

(1) रंगमंच आहे (2) दु:ख आहे

(3) गीत आहे (4) काव्य आहे

(*ii*) आपण नातेसंबंध का जपत असतो ? 1

(1) दु:ख देण्यासाठी (2) नाटक करण्यासाठी

(3) आधार मिळावा म्हणून (4) काम मिलावे म्हणून

(*iii*) नात्यांच्या पानगळतीला कोणत्या गोष्टी जबाबदार असतात ? 1

(1) स्वार्थी वृत्ती (2) चांगले संबंध

(3) एकमेकांना मदत (4) आनंदी जीवन

(*iv*) तिळगूळ ह्या गोडगोड बोला हे आपण कधी म्हणतो ? 1

(1) गणेश चतुर्थी (2) मकर संक्रांती

(3) दिपावली (4) नागपंचमी

(*v*) 'घरटं' या शब्दाचा समानार्थी शब्द शोधा : 1

(1) गाव (2) शहर

(3) घर (4) देश

6. चैतन्य उच्च माध्यमिक विद्यालय पणजी आयोजित बक्षिस वितरण कार्यक्रमाची कार्यक्रमपत्रिका तयार करा. 5

7. नवोदय उच्च माध्यमिक विद्यालयात गांधी जयंती कार्यक्रम साजरा होणार आहे त्या कार्यक्रमासाठी आभार प्रदर्शनाचे भाषण लिहा. त्यासाठी खालील मुद्यांचा आधार घ्या : 4

(अ) कार्यक्रमाचा उल्लेख

(ब) संस्थेच्या वतीने आभार

(क) मान्यवरांचे आभार

(ड) उपस्थितांचे आभार

(इ) सहकार्य करणाऱ्यांचे आभार

8. खालील संवाद **दोन** मित्रामधील आहे. तो तुम्ही तुमच्या शब्दांत पूर्ण करा : 5

राजू : रस्त्यावरून वाहतूक सध्या डोकेदुखी बनली ना.

संजू : हो बरोबर .............................................................................................

राजू : रस्त्यावरून वाहने हाकणे म्हणजे ..............................................................

संजू : प्रत्येक जण आपल्याला ...............................................................................

राजू : रस्त्यावरील वाहतुकीवर नियंत्रण असलं पाहिजे.

संजू : वाहतूक पोलिस .........................................................................................

राजू : आपली म्हणून जबाबदारी असते ना ?

संजू : प्रत्येक जण जबाबदारीने वागला तर ...........................................................

राजू : आम्ही आपल्यापासून सुरु करायला पाहिजे ..................................................

संजू : बरोबर तुझं ..............................................................................................

राजू : इतरांना पण सांगितलं पाहिजे ....................................................................

संजू : जागृती होणे आवश्यक ................................................................................